सातारा, गुरुवार, २१ डिसेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कोरेगावला भोसले कॉलेजमध्ये विजय दिन समारंभ

**कोरेगाव, ता. २० :** संरक्षण क्षेत्रातील संधींच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी देशसेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन ब्रिगेडियर सुनील बोधे यांनी केले.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालय व विजय दिन समारंभ समितीतर्फे आयोजित केलेल्या विजय दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील होते. कर्नल राजेंद्र जाधव, कॅप्टन महादेव भोसले यांचीही भाषणे झाली. याप्रसंगी हुतात्मा जवान गणेश कृष्णा ढवळे, दीपक जगन्नाथ घाडगे, रवींद्र बबन धनावडे, सुभाष लाला करांडे यांच्या प्रतिमांना पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. हुतात्मा जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता व कुटुंबीयांचा तसेच दुसऱ्या महायुध्दातील सहभागी पांडुरंग जाधव व दत्तू कासार यांचाही सत्कार झाला. कार्यक्रमात आरे येथील शिवतेज विद्यालयाने मल्लखांब, येथील चॅलेंज ॲकॅडमीने बँड डिस्प्ले, सातारा येथील चॅंपियन्स कराटेकडून सेल्फ डिफेन्स, डी. पी. भोसले महाविद्यालयाने धनुर्विद्या, तायक्वांदो, जोगवा, सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूलने ॲरोबिक्स, अश्ववंदना हुतात्मा श्रध्दांजली, सिव्हिल बँड शिरढोण यांची प्रात्यक्षिके सादर झाली. संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कर्नल विष्णूपंत चव्हाण, आजी-माजी सैनिक संघटना, नगरपंचायतीसह विविध संस्थांचे सहकार्य लाभले. डॉ. विद्या नावडकर, प्रा. भीमराव मदने, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. भीमराव मदने यांनी आभार मानले.



**कोरेगाव : वीरमाता व वीर कुटुंबीयांच्या सत्कारप्रसंगी ब्रिगेडियर सुनील बोधे, डॉ. अनिल पाटील, डॉ. विजयसिंह सावंत आदी.**